A.S.D. TOPIWALLA HIGH SCHOOL MALVAN
MAJI VIDYARTHI SANGHATANA
Room 1, VH Sangaonkar Dnyanmandir, Topiwalla High School Campus
Malvan 416606 Phone: 9529786781 Email: mvs.ths@gmail.com

**टोपीवाला हायस्कूल, माजी विद्यार्थी संघटना**
मुंबई मेळावा - ११ फेब्रुवारी २०२४ - **वृत्तांत**

टोपीवाला हायस्कूल माजी विद्यार्थी संघटनेचा मेळावा ११ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई येथे संपन्न झाला. या मेळाव्यासाठी १९५४ ते १९९९ आणि २०१७ या बॅचेस मधल्या १६४ माजी विद्यार्थ्यांनी आगाऊ वर्गणी भरून नोंदणी केली होती. कार्यक्रमाच्या १५ दिवस आधीच जागेअभावी नोंदणी थांबवावी लागली.

सुरुवातीला MVS चे सह-अध्यक्ष उमेश धारगळकर यांनी मालवण एज्युकेशन सोसायटी (MES) चे प्रतिनिधी अविनाश आजगावकर, आनंदकुमार चव्हाण आणि माजी मुख्याध्यापक तोरगलकर सर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. MVS कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी मिळून प्रस्तुत केलेल्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. MVS कार्यकारिणीच्या उमा आजगावकरने उपस्थितांचे स्वागत करून मेळाव्यामागचा उद्देश स्पष्ट केला आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालनही केले.

श्री अविनाश आजगावकर यांनी आपल्या भाषणात शाळेचे नवीन उपक्रम आणि शाळेसमोरची आव्हाने यांची विस्तृत माहिती दिली.

महेश अभ्यंकर यांनी अतिशय नावीन्यपूर्ण पद्धतीने सर्व उपस्थित माजी विद्यार्थ्यांचा परिचय त्यांच्या फोटोसह मोठ्या पडद्यावर एका प्रेझेंटेशन द्वारे करून दिला.

राजीव कुबल, देविदास चव्हाण आणि उमेश धारगळकर यांनी तयार केलेल्या प्रश्नमंजुषेचाही कार्यक्रमात समावेश होता. क्विझमास्टर्स होते राजीव कुबल आणि देविदास चव्हाण. विजेत्यांना शाळेचा सुंदर फोटो असलेला मग बक्षीस म्हणून देण्यात आला.

MVS च्या कार्यवाह स्मिता करंदीकर यांनी आपल्या भाषणात माजी विद्यार्थी एकत्र येऊन काय करु शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणून शाळेच्या परिसरातील "व्यं. ह. सांगावकर ज्ञानमंदिर" या वास्तूचे निर्माण याविषयी माहिती दिली.

उमेश धारगळकर यांनी त्यांच्या “कृतज्ञतेचा एक प्रवास” या प्रेझेंटेशनद्वारे MVS च्या नवीन कार्यकारिणीचे गठण, त्यानंतर केलेली कामे, पुढील योजना आणि समोरील आव्हाने इत्यादी विषयी विवेचन केले. शाळेतील विद्यार्थ्यांना जगात उपलब्ध असलेले ज्ञान ऑनलाइन मिळावे यासाठी व्यं. ह. सांगावकर ज्ञानमंदिरात एक ई-लर्निंग रूम बनवण्याच्या MVS च्या प्रस्तावाला शाळेच्याच एका माजी विद्यार्थ्याकडून एकरकमी देणगी मिळाल्याचेही घोषित केले. तसेच MVS ने सुचवलेल्या आणखी काही कार्यशाळांसाठी प्रस्ताव मंजूर झाले आहेत हेही सांगितले.

माजी विद्यार्थ्यांनी MVS मध्ये एकत्र येऊन इतर माजी विद्यार्थी, शाळा आणि मालवण शहरासाठी काम करावे असेही ते म्हणाले. संघटना वाढवण्यासाठी सभासद बनण्याचे आणि ती सक्षम करण्यासाठी विविध रुपात सहाय्य करण्याचे त्यांनी सर्वांना आवाहन केले.

ज्यांच्या बॅचला ६० किंवा त्याहून जास्त वर्षे झाली आहेत, म्हणजेच १९६४ आणि त्यापूर्वीच्या बॅचेस मधील ह्या ७ माजी विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह (शाळेचा सुंदर फोटो) आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला: गजानन सामंत (१९५४), सुभाष मयेकर (१९५७), आनंदकुमार चव्हाण (१९५९), अविनाश आजगावकर (१९६१), विजय सकपाळ (१९६१), अनंत परुळेकर (१९६३) आणि जयसिंह पाटकर (१९६३)

शाळेसमोरील, विशेषतः इंग्लिश माध्यमाच्या जय गणेश हायस्कूल समोरील, आर्थिक आव्हाने पेलण्यासाठी माजी विद्यार्थी शाळेला कशी मदत करू शकतात याचे विवेचन अरविंद परुळेकर यांनी केले.

सुनील वझे यांनी केलेल्या आभार प्रदर्शनानंतर सर्वांनी मिळून पसायदान सादर केले आणि सकाळच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

त्यानंतरच्या स्वादिष्ट मालवणी भोजनाचा आस्वाद घेताघेता सर्वांनी जुन्या ओळखींना नव्याने उजाळा दिला आणि नव्या ओळखीही करुन घेतल्या.

शेवटच्या करमणुकीच्या कार्यक्रमात सर्वांनी उस्फूर्तपणे भाग घेतला. यात एका गंमतीशीर खेळाचाही समावेश होता. विजेत्यांना बक्षिसेही देण्यात आली.

MVS च्या कार्यकारिणी व्यतिरिक्त ह्या माजी विद्यार्थ्यांनी मेळाव्याच्या आयोजन आणि नियोजनासाठी अत्यंत मोलाची मदत केली;
आरती भाटिया, तृप्ती शिरोडकर, रिझवाना काझी, शिरीष शेट्ये, विष्णू पाटणकर, नागेश साठे, अर्जुन आचरेकर, महेश अभ्यंकर, देविदास चव्हाण आणि राजीव कुबल.

मेळाव्याच्या निमित्ताने MVS चे सभासद बनण्याच्या आणि MVS ला अर्थसहाय्य करण्याच्या आवाहनाला मिळालेल्या उदंड प्रतिसादातून **६०** नवीन माजी विद्यार्थी MVS चे आजीवन सभासद बनले आणि एकूण रू. **१,२९,३३४** एवढी रक्कम सामान्य देणगी म्हणून जमा झाली. त्याशिवाय अनेकांनी विविध स्वरूपात सहाय्य करण्याची तयारी दर्शवली.

पुन्हा भेटण्याचा संकल्प करुन "कभी अलविदा ना कहना" म्हणत सर्वांनी निरोप घेतला आणि या सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत चाललेल्या यशस्वी मेळाव्याची सांगता झाली.

-आयोजक टीम